म. ग्र. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. २५३
१८२५

# गिरीश

स्वीकारले १८-१-३
८८०

REFBK-0003142
REFBK-0003142

रविकिरणमंडळ.

१८-९-३९

३९८२

REFBK-0003142

REFBK-0003142

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

## रविकिरणमंडळ

( कै० सौ० मनोरमाबाई रानडे, बी. ए.)

श्रीधर बाळकृष्ण रानडे, बी. ए., एम्. एस्सी.

दत्तात्रेय लक्ष्मण गोखले, एम्. ए.

विठ्ठलराव दत्तात्रेय घाटे, एम्. ए., बी. टी.

माधवराव पटवर्धन, एम्. ए.

गजानन त्र्यंबक माडखोलकर

यशवंत दिनकर पेंढरकर

शंकर केशव कानेटकर, बी. ए.



कै० सौ० मनोरमाबाई रानडे, बी. ए.

जन्म
१४ जानेवारी १८९६

अवसान
१३ जानेवारी १९२६

कै० सौ० मनोरमाबाई रानडे, यांस

सादर समर्पण.

# प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तक हें रविकिरणमंडळाचें सातवें पुस्तक म्हणून प्रसिद्ध होत आहे. 'कला' हें जरी एक प्रेमविषयक काव्य असलें, तरी त्यांत, ललितकलांच्या अभ्युन्नतीसाठीं प्रयत्न करूं पाहणाऱ्या सौंदर्य-जीवीजनांची निराशाच चित्रित केलेली आहे. वाचकांनीं ही दृष्टी ठेवून काव्य वाचावें. कडवें ३३ मधील गज्जलाच्या चार ओळी माझे स्नेही 'माधव जूलियन्' यांच्या आहेत.

आश्विन वद्य ४ शके १८४८
रविवार २४-१०-२६ पुणें

गिरीश

# कला

३९४२

पूर्वदिशेहुनि किरण रुपेरी चंद्राचे हसरे आले
रात-देविचें न्यहार पातळ सुंदर चंदेरी खुललें

सांजपासुनी सांठविलेलीं फुलें मनोहर आणि हिरे
प्रिय चंद्रावर तिनें उधळिलें प्रेमाचें लेणें गहिरें

वेताळावर छेडछेडुनी कोमल किरणांच्या तारा
लकेर फेंकित नाचत येई मधुर वसंताचा वारा

फुलेल शिंपित किंवा कोणी नवा फुलारी हा आला
कविकातळही चंद्रकरानें आणि सुगंधानें न्हाला

सेवित शांती झुडुपें निजलीं किरणांच्या शेल्याखालीं
वाऱ्यासंगें मात्र डहाळ्या तरुच्या डुलल्या वर, खालीं

झुळुक तों महा-विद्यालयिंच्या भव्य रंगभूशालेंत
येउन सुखवी छात्रगणांना संमेलन-आनंदांत

चिकार भरलें मंदिर गुरुजन-विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं
छेडायाला सारंगी परि आला नव्हता कुणि अजुनी

रसिका, मेधाविनी, कलेची भक्त अशी कोणी बाला
मैत्रिणींमधें येउन बसली समोर शांतासवे कला

रूपसंपदा, तेजस्वी मुखचर्या, बुद्धिप्रभ नयनें
शालिनता, हें पातळ साधें, सादर आकर्षितीं मनें

अधीर झाले रसिक अनावर; आतुर होय कला-बाला
दक्षिण-विद्यालयिंचा बघण्या मोहन सारंगीवाला

सं-काव्य ८८०

आनंदाचा तरु मोहरला, बिजलीचें तेजहि फुललें
मोहक हांसत, मोहन आला, स्वागत टाळ्यांनीं झालें

सस्मित पाहे कुतुकानें तो वरती, भंवतीं आणि पुढें
स्निग्ध दृष्टि तों समोर ठरली आणि आंतुनी हृदय उडे

क्षण मोहनच्या आणि कलेच्या दृष्टींचें मीलन झालें
प्रेमानंदीं जीव बहरला ! अंग शहारुनही आलें !

दोन विजांची एक ज्योती स्पर्शुनि हृदयाला गेली
अपूर्व लागुनि जरा समाधी, दिव्य भावना पालवली

परि सांवरुनी मन आनंदप्रेरित सारंगीवाला
नाजुक अंगुलि सारंगीवर लागे हळु फिरवायाला

मूक शांतता क्षणीं पसरली ! कुतुकें भरलीं प्रतिवदनीं
गभीर जळ वा मृदुल हांसलें किंचित वायुतरंगांनीं

बोट झरझरा फिरूं लागलें दावुनि गोड कळाकुसरी
रागदारिची गभीर छाया नाजुक गोलाई पसरी

मधुनी मधुनी समोर फेकुनि हंसरे प्रेमळ दृक्पात
जणुं हृदयींचे भाव बोलवी मोहन मृदु झंकारांत

सभा रंगली ! एक मनानें लोक लागले डोलाया
आणि कलेची समाधि लागे उघड्या डोळां त्या ठायां

गानदेवता मोहनच्या कीं, अंगुलिमध्यें संचरली ?
रंगदेवता मूर्तिमती वा कलामिषानें अवतरली ?

अखेर त्यानें 'प्रेम बाइ हें वेडें' गाणें वाजविलें
आणि भैरवी छेडुन सकलां मधुरालापीं गुंगविलें

वादन सरतां, शांताचा पति, शरद, कलेचा मित्र खरा
विद्यार्थ्यांचा प्रतिनिधि म्हणुनी उठला बोलायास जरा

सुंदर भाषण करुनि तयानें मोहनचे गुण गौरविले
मोहनचेही तेजोलोचन विनयानें होते नमले

कुलपति-हस्तें पदक तयाला गौरववचनीं देवविलें
बंधुजनीं अभिनंदन केलें ! हृदय कलेचें कौतुकलें !

हारतुऱ्यांनीं मंडित मोहन वंदन करुनी सभाजनां
जातां जातां फेकुन जादू पाहत गेला मृगनयना

झुळुक तों महा-विद्यालयिंच्या भव्य रंगभूशालेंत
येउन सुखवी छात्रगणांना संमेलन-आनंदांत

चिकार भरलें मंदिर गुरुजन-विद्यार्थी-विद्यार्थिनिंनीं
छेडायाला सारंगी परि आला नव्हता कुणि अजुनी

रसिका, मेधाविनी, कलेची भक्त अशी कोणी बाला
मैत्रिणींमधें येउन बसली समोर शांतासवे कला

रूपसंपदा, तेजस्वी मुखचर्या, बुद्धिप्रभ नयनें
शालिनता, हें पातळ साधें, सादर आकर्षितीं मनें

अधीर झाले रसिक अनावर; आतुर होय कला-बाला
दक्षिण-विद्यालयिंचा बघण्या मोहन सारंगीवाला

आनंदाचा तरु मोहरला, बिजलीचें तेजहि फुललें
मोहक हांसत, मोहन आला, स्वागत टाळ्यांनीं झालें

सस्मित पाहे कुतुकानें तो वरती, भंवतीं आणि पुढें
स्निग्ध दृष्टि तों समोर ठरली आणि आंतुनी हृदय उडे

क्षण मोहनच्या आणि कलेच्या दृष्टींचें मीलन झालें
प्रेमानंदीं जीव बहरला ! अंग शहारुनही आलें !

दोन विजांची एक ज्योती स्पर्शुनि हृदयाला गेली
अपूर्व लागुनि जरा समाधी, दिव्य भावना पालवली

परि सांवरुनी मन आनंदप्रेरित सारंगीवाला
नाजुक अंगुलि सारंगीवर लागे हलु फिरवायाला

मूक शांतता क्षणीं पसरली ! कुतुकें भरलीं प्रतिवदनीं
गभीर जळ वा मृदुल हांसलें किंचित वायुतरंगांनीं

बोट झरझरा फिरूं लागलें दावुनि गोड कळाकुसरी
रागदारिची गभीर छाया नाजुक गोलाई पसरी

मधुनी मधुनी समोर फेकुनि हंसरे प्रेमळ दृक्पात
जणुं हृदयींचे भाव बोलवी मोहन मृदु झंकारांत

सभा रंगली ! एक मनानें लोक लागले डोलाया
आणि कलेची समाधि लागे उघड्या डोळां त्या ठायां

गानदेवता मोहनच्या कीं, अंगुलिमध्यें संचरली ?
रंगदेवता मूर्तिमती वा कलामिषानें अवतरली ?

अखेर त्यानें 'प्रेम बाइ हें वेडें' गाणें वाजविलें
आणि भैरवी छेडुन सकलां मधुरालापीं गुंगविलें

वादन सरतां, शांताचा पति, शरद्, कलेचा मित्र खरा
विद्यार्थ्यांचा प्रतिनिधि म्हणुनी उठला बोलायास जरा

सुंदर भाषण करुनि तयानें मोहनचे गुण गौरविले
मोहनचेही तेजोलोचन विनयानें होते नमले

कुलपति-हस्तें पदक तयाला गौरववचनीं देवविलें
बंधुजनीं अभिनंदन केलें ! हृदय कलेचें कौतुकलें !

हारतुऱ्यांनीं मंडित मोहन वंदन करुनी सभाजनां
जातां जातां फेकुन जादू पाहत गेला मृगनयना

सभा विसर्जन होउनि, गेले छात्र आपुल्या खोलींत
मधुरांगुलिचें प्रशंसुनी बल आपआपुल्या बोलींत
मैदानामधिं बोलुन अंमळ कलावतीशीं चंद्रकरीं
जेवायाला निमंत्रुनी तिज, गेले शांता--शरद घरीं

मैत्रिणीसवें मुग्धपणानें कला मनीं गुंगत चाले
परि न कुणाला कळलें कोठें, काय, कसें, कोणा झालें !
झोंप कोठली ? भडकुन गेलें मन अंधारीं खोलींत
अंतःसागर हेलावोनी लाटा उठल्या हृदयांत

पहाट झाली; मंजुळ वाणी फुटली अंबेराईला
कलेस वाटे, अजुन वाजवी गाणें सारंगीवाला

काव्य ... ८० ...

स्फूर्ति-प्रेरित तेजोनयना संचारुन वेगें उठली
दीप लावुनी मेजावरला, अधरीं कांहीं पुटपुटली

खळबळ हृदयीं, रंग मुखावर, तेजस्वी प्रतिभा नयनीं
अज्ञातावर निश्चळ नेत्रें ठरवुनि गुणगुणली कवनीं

चित्रकलेला, काव्यकलेला आजवरी संगोपून
कलावती ती सार्थ जहाली सुंदरतेवर मोहून

नयनीं होते अदृश्यांतल्या चमकत वार्णीचे बोल
फेकित होते तेज नभींचें खिडकींतुन तेजोगोल

उकळ्या थांबुन विचारवातें बहार आला हृदयाला
आणि कलेची कळी उमलली, कवनीं 'सारंगीवाला'

वाचवाचतां अपुल्याशीं ती शय्येवर झोपी गेली
कवनपत्रिका छातीवरती घडुन जिवाशीं करि केली

रम्य उजळलें विश्व सकाळीं, स्वप्नें गोड तरी अजुनी
सरलीं नव्हतीं कलावतीचीं, कपोल गेले जरि भिजुनी

हांक मारितां मग मैत्रिणिनें, दचकुन जागी ती झाली
ती स्वप्नावलि आणि सूर ते वावरले तरि भंवताली

दिनभर साऱ्या कवन आपुलें वाचुन गुणगुणली सूर
आणि रंगलां मनिंच्या स्वप्नीं बालेचा बदले नूर

बसे एकली टेकडीवरी पाहत मावळतीं किरणें
परि न थांबले सूर हवेंतिल आणि वायुचें भिरभिरणें.

वाटे तिजला 'अजुनि न वठले कवनीं श्रवलेले सूर !'
उदासवाणी म्हणुनि बसे ती लागुन हृदया हुरहूर

हलकें हलकें सारंगीच्या बनवि सुरांचे ती रंग
रेखित कांहीं चित्र हवेवर कल्पकता झाली दंग

दिव्य सुरांतुन तोंच उमटलें चित्र मनोहर मूर्तीचें
निश्चळ खिळले त्यावर डोळे चित्रकलेच्या पूर्तीचे

रंग निमाले मावळतीचे, अंधारुन आल्या छाया !
नभिंच्या तारा हळुच सांगती कलावतीला परताया

रात्रीं पडतां शय्येवर ती, डोळ्यास न लागे डोळा
स्वप्नसंगिनी समोर पाहे हवेंत सारंगीवाला.

उठुन सकाळीं कल्पनेंतलें स्वप्न मधुर डोळ्यापुढलें
मृदु कुंचलिनें फलकावरती रम्य, कलेनें रंगविलें

भाव मनींचे आणिक भाषा प्रतिसारंगीची वठली
आणि कला कां एकाएकीं लाजुन त्यापुढती लवली !

सहज कलेनें हा रंगविला मोहक सारंगीवाला
आणि जादुच्या करस्पर्शानें जाय कला पूर्णत्वाला

दोन दिसांनीं घरास जातां कौतुक वडिलांनीं केलें
काव्यकलेच्या, चित्रकलेच्या स्तुतिस न शब्द पुरे पडले

प्रकाशनास्तव रावांनीं तीं 'ललितकले'ला पाठविलीं
कल्पकतेची चतुर देवता मात्र कला मनिं हुरहुरली !

हृत्फलकावर छबी घेउनी, गुंगुनि मोहन जों गेला
भक्त कलेचा, ध्यानीं रमला अंतर्मुख वेळोवेळां

आनंदानें हृदय बहरलें, मधुर वायवी स्वप्नानें
आणि कधीं तर व्याकुळ झालें सारंगीच्या गीतानें

हलली नाहीं कल्पनेंतली तेजस्वी मूर्ती पुढली
प्रेमभावना त्या तेजावर खिळुन अंतरीं कढकढली

दिव्यत्वाची अपूर्वता तों प्रतीत झाली त्या नयनीं
अनंतांतल्या सौंदर्याचा गोडपणा दिसला भरुनी

निसर्गांतल्या रागदारिची गोड माधुरी हास्यांत
एकवटूनी, वाटे, नाचे सारंगीच्या तालांत

उठुन सकाळीं कल्पनेंतलें स्वप्न मधुर डोळ्यापुढलें
मृदु कुंचलिनें फलकावरती रम्य, कलेनें रंगविलें

भाव मनींचे आणिक भाषा प्रतिसारंगीची वठली
आणि कला कां एकाएकीं लाजुन त्यापुढती लवली !

सहज कलेनें हा रंगविला मोहक सारंगीवाला
आणि जादुच्या करस्पर्शनें जाय कला पूर्णत्वाला

दोन दिसांनीं घरास जातां कौतुक वडिलांनीं केलें
काव्यकलेच्या, चित्रकलेच्या स्तुतिस न शब्द पुरे पडले

प्रकाशनास्तव रावांनीं तीं 'ललितकले'ला पाठविली
कल्पकतेची चतुर देवता मात्र कला मनिं हुरहुरली !

हृत्फलकावर छवी घेउनी, गुंगुनि मोहन जों गेला
भक्त कलेचा, ध्यानीं रमला अंतर्मुख वेळोवेळां

आनंदानें हृदय बहरलें, मधुर वायवी स्वप्नानें
आणि कधीं तर व्याकुळ झालें सारंगीच्या गीतानें

हलली नाहीं कल्पनेंतली तेजस्वी मूर्ती पुढली
प्रेमभावना त्या तेजावर खिलुन अंतरीं कढकढली

दिव्यत्वाची अपूर्वता तों प्रतीत झाली त्या नयनीं
अनंतांतल्या सौंदर्याचा गोडपणा दिसला भरुनी

निसर्गांतल्या रागदारिची गोड माधुरी हास्यांत
एकवटूनी, वाटे, नाचे सारंगीच्या तालांत

ब्रह्मकुलासम थोर संस्कृती मोहनच्या घरची होती
अजुन पित्याच्या संगीताची गाजतसे भवतीं कीर्ती
कलावंत तो खरा विशारद रंगुनि निज-वादनगानीं
ओढुनि घेई आंतर वृत्ती अपुल्या मधुसंगीतांनीं
सरस्वतीच्या संगें येउन लक्ष्मी राहे मग दारीं
जीवित झालें जरा निरामय, गोड कलामय संसारीं
आणि उभविलें 'मोहन-मंदिर' त्यानें पर्वतिच्या रानीं
एकांतप्रिय तो विहगांच्या आणि रमे अपुल्या गानीं
स्वच्छंदानें नित्य तयानें प्रत्यूषीं, सायंकाळीं
करुणरवांनीं पर्वतीशपद आळविले सुस्वरमेळीं

काव्य ८०

इथेंच लाभुन थोर संस्कृती, मोहन-हृदया ये भरती
गानझंकृती ओढितसे मन पार्थिवांतुनी कधिं वरती

निसर्गांतल्या गांभीर्याचें, सौंदर्याचें गूढ खरें
जाणायास्तव ललितकलांचें वेड लागलें तया पुरें

त्या स्फूर्तींची देवि भेटतां मोहन वेडावुन गेला
भक्त कलांचा आधीं होउन, कलावतीचा मग झाला

कधीं कल्पुनी समोर बसली बाला ऐकाया गीत
एकतानमन होउन छेडी तो सारंगीवर गीत

यापरि रमतां ध्यानीं, स्वप्नीं, मास लोटले भर तीन
स्मृति-पुलिनावर जीवन-वांछी तळमळला मोहन-मीन

ब्रह्मकुलासम थोर संस्कृती मोहनच्या घरची होती
अजुन पित्याच्या संगीताची गाजतसे भवतीं कीर्ती

कलावंत तो खरा विशारद रंगुनि निज-वादनगानीं
ओढुनि घेई आंतर वृत्ती अपुल्या मधुसंगीतांनीं

सरस्वतीच्या संगें येउन लक्ष्मी राहे मग दारीं
जीवित झालें जरा निरामय, गोड कलामय संसारीं

आणि उभविलें 'मोहन-मंदिर' त्यानें पर्वतिच्या रानीं
एकांतप्रिय तो विहगांच्या आणि रमे अपुल्या गानीं

स्वच्छंदानें नित्य तयानें प्रत्यूषीं, सायंकाळीं
करुणरवांनीं पर्वतीशपद आळविले सुस्वरमेळीं

काव्य ८०

इथेंच लाभुन थोर संस्कृती, मोहन-हृदया ये भरती
गानझंकृती ओढितसे मन पार्थिवांतुनी कधिं वरती

निसर्गांतल्या गांभीर्याचें, सौंदर्याचें गूढ खरें
जाणायास्तव ललितकलांचें वेड लागलें तया पुरें

त्या स्फूर्तीची देवि भेटतां मोहन वेडावुन गेला
भक्त कलांचा आधीं होउन, कलावतीचा मग झाला

कधीं कल्पुनी समोर बसली बाला ऐकाया गीत
एकतानमन होउन छेडी तो सारंगीवर गीत

यापरि रमतां ध्यानीं, स्वप्नीं, मास लोटले भर तीन
स्मृति-पुलिनावर जीवन-वांछी तळमळला मोहन-मीन

श्रावणझड लागून भंवतिची हिरवळलीं डोंगर-रानें
दक्षिण-विद्यालयिंच्या वेली फुलल्या नूतन बहरानें

रम्य सकाळीं असाच खोलिंत मोहन गुंगुनि हृद्गानीं
चाळित बसला 'ललितकले'चा अंक नवा मधुनी मधुनी

तोंच थांबला पानीं एका नव आश्चर्यानंदानें
कारण पानें दोन कलेच्या भरलीं मधु कौशल्यानें

पुनःपुन्हा ती वाचुन कविता सुंदर 'सारंगीवाला'
मोहन ठरवुनि चित्रावरती नेत्र, अधीरपणें धाला

हृदयामधली भाषा कळली व्याकुळलेल्या हृदयाला
कलावतीच्या कौशल्यानें मोहन मोहुनिया गेला.

हृदयामधले भाव आपुले दिसले त्याला कवनांत
गूढ तयांचा ध्वनि आढळला चित्राच्या मधु रंगांत

अधिकाधिक तो खिळवी डोळे मधुर कलामय दृष्टीनें
तों आढळली निज हृदयाची पूरित त्यास तिथें गानें

ध्येय जिवाचें समरसलेलें अचुकपणें दिसतां त्याला
प्रेमभावनाकुल तो अधरीं चुंबि तियेच्या कवनाला

धरि हृदयाशीं चित्र कलेचें, कवन गुणगुणे एकांतीं
सारंगीवर छेडायाला बसला तो कोमल शांती

तों स्वरसंगम अपूर्व कांहीं प्रतीत झाला हृदयांत
आणिं छेडिला अंगुलिनें तो स्फूर्तिभरें झंकारांत

श्रावणझड लागून भंवतिची हिरवळली डोंगर-रानें
दक्षिण-विद्यालयिंच्या वेली फुलल्या नूतन बहरानें

रम्य सकाळीं असाच खोलिंत मोहन गुंगुनि हृद्‌गानीं
चाळित बसला 'ललितकले'चा अंक नवा मधुनी मधुनी

तोंच थांबला पानीं एका नव आश्चर्यानंदानें
कारण पानें दोन कलेच्या भरलीं मधु कौशल्यानें

पुनःपुन्हा ती वाचुन कविता सुंदर 'सारंगीवाला'
मोहन ठरवुनि चित्रावरती नेत्र, अधीरपणें धाला

हृदयामधली भाषा कळली व्याकुळलेल्या हृदयाला
कलावतीच्या कौशल्यानें मोहन मोहुनिया गेला.

हृदयामधले भाव आपुले दिसले त्याला कवनांत
गूढ तयांचा ध्वनि आढळला चित्राच्या मधु रंगांत

अधिकाधिक तो खिळवी डोळे मधुर कलामय दृष्टीनें
तों आढळली निज हृदयाची पूरित त्यास तिथें गानें

ध्येय जिवाचें समरसलेलें अचुकपणें दिसतां त्याला
प्रेमभावनाकुल तो अधरीं चुंबि तियेच्या कवनाला

धरि हृदयाशीं चित्र कलेचें, कवन गुणगुणे एकांतीं
सारंगीवर छेडायाला बसला तो कोमल शांती

तों स्वरसंगम अपूर्व कांहीं प्रतीत झाला हृदयांत
आणिं छेडिला अंगुलिनें तो स्फूर्तिभरें झंकारांत

पुनःपुन्हा तो सुस्वरसंगम वाजवितां, वाढे गोडी
अनुपम अंतर्भाव-सूक्ष्मता पाझरली थोडी थोडी

भाव कलेचा, स्वर मोहनचे मिळतां, मधु संगम झाला
विहंगमांचा निसर्गमंजुळ कीं ध्वनि हृदयगम आला ?

अपूर्व, सुंदर किंवा निर्झर घेत असे स्वैरालाप ?
कीं गंधर्वी येइ लकेरी स्वर्गांतुन आपोआप ?

निसर्गांतली एकतानता कीं सारंगींतुन बोले ?
नादब्रह्मीं विलीन होउन मोहन आनंदें डोले

आणि तयानें लेखांमधुनी प्रकाशिली ही अनुभूती
मोहुनि टाकी सुस्वर-माला; थोर तया लाभे कीर्ती

३१४२
२१-०१-९८०



प्रफुल्ल झालें हृदय, वर्षतां कर या अनुभव-सवित्याचें
गुंजत राहे उडुन, कलेच्या प्रीतिकळीवर मन त्याचें

अन्य दिनीं मग करुनि मनाचा निश्चय त्यानें आत्मबळें
कलावतीला प्रेमपत्रिका लिहिली उघडुनि हृदय-दळें

पत्रदूतिका हृद्भावांचें आविष्करण करील कशी,
किंवा पाहिल हृदयदेवता प्रीतीला लावुन निकषीं,

चिंतन चाले यावर आणिक आतुरतेनें जीव झुरे
सारंगीविण मन रिझवाया जवळी नव्हतें कुणि दुसरें

निराशलें मन ! तों शरदानें स्वयें येउनी एक दिनीं
सारंगी-रव छेडायाला बोलविलें अपुल्या सदनीं

पुनःपुन्हा तो सुस्वरसंगम वाजवितां, वाढे गोडी
अनुपम अंतर्भाव-सूक्ष्मता पाझरली थोडी थोडी

भाव कलेचा, स्वर मोहनचे मिळतां, मधु संगम झाला
विहंगमांचा निसर्गमंजुळ कीं ध्वनि हृदयगम आला ?

अपूर्व, सुंदर किंवा निर्झर घेत असे स्वैरालाप ?
कीं गंधर्वी येइ लकेरी स्वर्गातुन आपोआप ?

निसर्गांतली एकतानता कीं सारंगींतुन बोले ?
नादब्रह्मीं विलीन होउन मोहन आनंदें डोले

आणि तयानें लेखांमधुनी प्रकाशिली ही अनुभूती
मोहुनि टाकी सुस्वर-माला; थोर तया लाभे कीर्ती

३१४२
२१-०१-९०



प्रफुल्ल झालें हृदय, वर्षतां कर या अनुभव-सवित्याचें
गुंजत राहे उडुन, कलेच्या प्रीतिकळीवर मन त्याचें

अन्य दिनीं मग करुनि मनाचा निश्चय त्यानें आत्मबळें
कलावतीला प्रेमपत्रिका लिहिली उघडुनि हृदय-दळें

पत्रदूतिका हृद्भावांचें आविष्करण करील कशी,
किंवा पाहिल हृदयदेवता प्रीतीला लावुन निकषीं,

चिंतन चाले यावर आणिक आतुरतेनें जीव झुरे
सारंगीविण मन रिझवाया जवळी नव्हतें कुणि दुसरें

निराशलें मन ! तों शरदानें स्वयें येउनी एक दिनीं
सारंगी-रव छेडायाला बोलविलें अपुल्या सदनीं

मुळाकांठच्या गोल सुशोभित बंगलींतल्या खोलींत
सौंदर्याच्या सदभिरुचीची प्रसन्नता विलसे शांत

गार वायुची झुळुक डोंगरी खिडकीमधुनी येऊन
मेजावरल्या फुलदाणींतिल जाय फुलांना हसवून

खुर्च्या टाकुन भंवती, बसलीं मोहन, शांता, शरद, कला
ओळख झाली; मनांत लाजुन, मोहन आनंदीं खुलला

ललितकलांचा विषय मजेचा; रंगुनि गेले सर्व जरा
कलाच सांगे सौंदर्याचा समजावूनी अर्थ खरा

'भारतमाता कसें कलांचें वैभव जगतीं मिरवील'
यावर बोले प्रसन्न होउन, उदार मोहनचा दील

मोहनवदनीं टक लावूनी, मधुनि कला पाहत राहे
चंद्रापासुनि अमृतरसाचा वाटे ओघ स्रवताहे

'गानझंकृती स्वप्नें निर्मुन गोड, मनोरम रिझवि मना'
रहस्य याचें ऐकुन, कौतुक वाटे शांता-शरदांना

भालावरले अलक तयाचे नाचत होते वायुसवें
चहा पितांना, कलेस दिसलें कांहिं मनोहर त्यांत नवें

छेडुनि त्यानें मग सारंगी वेड लाविलें सर्वांला
आणि वाजवी एकदिलें तो अखेर 'सारंगीवाला'

भोजन झालें! छात्र-निवासा उन्मन दोघें मग गेलीं
परि पत्राची ओळख न कुणी कोणाला अजुनी दिधली

एक दिनीं मग पाउस पडुनी निरभ्र झालें आकाश
थंड गारठा तरी सांजचा झोंबत होता अंगास

वेताळावर आकाशाच्या पडलेल्या मोहक छाया
चुकून कोणी रसिक एकला जाई वर अवलोकाया

गवतावरलीं शुभ्र मौक्तिकें चमकुन शेवटल्या किरणीं
झाडावरल्या पर्णबिंदुशीं हांसत होतीं प्रतिक्षणीं

तिथेंच होती फांदीखालीं घालुन पाउसकोट कला
जवळ डहाळीसंगें मोहन खेळतसे काव्यात्म भला

हलुच डहाळी तोंच हालली वाऱ्यानें—कीं हातानें ?
थरारण झालीं तोंच कलेवर ! खुललीं मोहनचीं नयनें !

विनयवती ती पाहे खालीं दहिंवर गालींचें पुसुनी
सांगत होता महति कलांची मोहन तिज समजावूनी

मधेंच केव्हां जोड देउनी, विरोधुनी केव्हां त्याला
ललितकलांचें रहस्य सांगे पटलेलें उकलुन बाला

प्रीत रंगली ! काळ लोटला किति उभयांना नच कळलें
खडकामधुनी काळोखांतुन पाय घराला मग वळले

कधीं सुटीला डोंगर-रानीं छायाचित्रें नव घ्याया
काधिं देखावे चितारण्यास्तव जाती चवघे विहराया

यापरि भेटत असतां गेले आनंदीं महिने दोन
दिधला नव्हता अजुन कलेनें परि निज हृदयींचा 'हो-न'

खोपवलीच्या उंच कड्यावर बसुनी हिरव्या भूमिवरी
रेखित होती आज समोरिल देखावा रमणीय परी

प्रति नवसृष्टी निर्मित जाई हात कलेचा कुंचलिनें
पाठीमागुन पाहत रमलीं निश्चळ मोहनचीं नयनें

शरद आपुल्या रमणीसंगें छायाचित्रें नवीं नवीं
घ्यायासाठीं गेला होता कड्याखालती रसिक–कवी

मुके कलावान् अपुल्या भंवती पाहुनि सारे सृष्टींत
दीनपणानें पडली होती सारंगी मखमालींत

मृदुल हातचें चित्र कलेच्या निववी डोळे मोहनचे
आणि कलेचें केवळ आतां हृन्नयनांपुढती नाचे

अथांग कौतुक नेत्रीं भरुनी  खळबळ झाली हृदयांत
आणि दाटली प्रेमळ गंगा प्रेमाश्रूंची नयनांत

निसर्गीतली रंगसुबकता वठवित रमली जों बाला
'कले ! कले !' तों कानावरती ध्वनि तळमळलेला आला

अपुरें टाकुन चित्र हातचें, वळुनी सन्मुख होय कला
हृदयामधलें गुपित अश्रुंनीं विचारलेंच अखेर तिला

लाजुन लवली किती वेळ ती, गुलाब गालीं उमलोनी
अंग थरारुन, येउं लागली धडधड हृदयांतिल कानीं

आणि मुखांतुन होकाराच्या अमृताचे स्रवले थेंब
झेलुन घेई मोहन ओठीं, साक्षी ठेवुनि रविबिंब !

'अपूर्णतेमधिं अपूर्व गोडी! चित्र राहुं दे, बैस अशी;
प्रेमगीत ही सारंगी तर गाइल अपुली पहा कशी-'
बोलुनि इतुकें, सारंगीच्या जुळवुनिया मंजुळ तारा
मोहन काढी सूर सुकोमल, सांथ देतसे वनवारा—

[ चालः—शाम घुंगटपट खोलो ]

प्रीतिरसीं जग न्हालें। बाले। ध्रु०॥
ओहळ गाती झुळझुळ गाणीं
स्थिरचर त्यांत निमालें। बाले

वंजुल-कुंजीं मंजुल गायन
गात समीरण चाले। बाले

मधुर फुलांतुन, कर सोनेरी
गुंजन ऐकुन धाले। बाले

रानशिळेला टेकुन बाला, हातमिठी गुडघा घाली
एक मनानें गानीं रमुनी, पर्युत्सुक हृदयीं झाली

नांदत होती गभीर शांती प्रसन्न आलां चराचरीं
कोठें कोठें सुरेल ओहळ मात्र सुराचा सूर धरी

तों आलापुन पालुपदाचे सूर, लकेरी घेऊन
शरद घातला शांतासंगें हांसत वरति समोरुन

दुरुनच आधीं त्यानें उभयां छायाचित्रित झणिं केलें
मंजुळ गाणीं ऐकाया मग जाउनि ते जवळी बसले

अखेर गाई कला, वाजवी मोहन 'सारंगीवाला'
गवतीं आरुण फुलें लाजलीं, बघुनि कलेच्या मृदु गाला

अशा परीनें दिव्य सुखाचा घालवुनी दिन रानांत
परतुन आले सायंकाळीं विहरत ते आनंदांत

एकदिनीं मग भाविकालचे निश्चय उभयांनीं केले
शिक्षण सरतां विवाहसूत्रीं बद्ध व्हावयाचें ठरलें

वृत्त कळवितां, शरदाच्या तर आनंदाला पार नुरे
शांता बोले 'भारत मिळविल सुयश कलेच्या उद्धारें'

गुणगुण ऐकुन अपुरी, कोणी भकूं लागले भलभलते
परि सहकंपाभावीं कोणा हृदय कुणाचें का कळतें ?

अभ्यासाचा सुरू जहाला नित्यक्रम आपोआप
निज कर्तव्यीं दोघें रमलीं सोसुन विरहाचा ताप

होय परीक्षा; 'मोहन-मंदिरिं' एकदिनीं चवघें जमलीं
गुजगोष्टी मग दिनभर झाल्या; आणि कला गांवीं गेली !

पूजुन छायाचित्रें केव्हां, पत्रें लिहुनी काव्यमय
जिववुन आतां परस्परां तीं करितीं हृदयें निरामय

'स्नातक' होतां कलेस सुंदर, मोहक, सान, नवा पुतळा
'कलादेविचा' संगमरवरी भेट तयानें पाठविला

'वीणावादन–निरतशारदा' विणलेली मोहक रंगीं
भेट कलेची, गेली होती परि ऐकाया सारंगी

आणि कलेच्या घरांत उठली लाट कौतुकानंदाची
कुजबुज झाली तोंच घरीं, तिज बद्ध विवाहीं करण्याची !

श्रीमंतीची हाव अनावर, हट्ट मनींचा वा नकळे
परी पित्याचे जुलमी डोळे धनवंतावरुनी वळले

विचार घ्याया (?) निजकन्येचा एक दिनीं आले राव
सत्य समजलें आणि मनींची मावळली सारी माव

नकार ऐकुन साफ कलेचा, संतापाला पार नुरे
परोपरींनीं छळुनी तिजला करिती सारे पुरे पुरे

हाय ! कलेनें वृत्त कळविलें अपुलें मोहनला सारें
तळमळ होउन तीव्र, तयाच्या अंगीं संचरलें वारें

लिहून रावां सरळ कहाणी, निश्चय अपुले तो कळवी
दया कलेवर व्हावी म्हणुनी नम्र वचांनीं मन वळवी

बणवा भडकुन झंझावातें, तेल तयावर कीं पडलें ?
पत्रलेखना बंदी झाली ! उभय अंतरीं कढकढले !

कुठें धरावी आस भेटिची, जीव कशावर जगवावा !
तिमिर दाटलें हृदयीं; लागे ध्यास कलेचा मग जीवा

तळमळ झाली आर्त जिवाची अघोर लागुन जिवझुरणी
अस्थिर झालें मन शरदाचें मग उत्कटुनी स्नेहऋणीं

धाडस केलें स्वयें तयानें स्नेहासाठीं निकराचें
दुर्दैवें परि पुन्हा बांधिलें अपयश पदरीं कायमचें

मोहनजनका उलट कळविलें रावांनीं हें रंगवुनी
प्रतिलोमाचा धाक घालुनी, दापियलें निष्ठुर वचनीं

घाव जिव्हारीं अघोर लागुन कलेस बोलुन घेइ पिता
शब्द विषारी सोडुन, शिक्षण दोषाया लागे जनता

तुकडे जमवुनि हृद्भावांचे आणि जिवाच्या ध्येयाचे
वेळिं-अवेळीं घालित बैसे स्नान तयां ती अश्रूंचें

कधीं स्मृतीनें मधुर मागलीं चित्रें रंगविलीं गोड
सुरेल लहरी हृदयीं अस्फुट उठुन, कधीं करि जिवतोड

कलादेविची मूर्त मनोहर ध्यात बसे ती एकांतीं
प्रियजीवाच्या छायाचित्रा चोरुन पूजी दिनरातीं

पाहुनि हें मग अदय पित्यानें पुतळ्याचा केला चूर
खंगत गेली बाला हृदयीं, वोसंडुन डोळां पूर !

दाउसवाणा मोहन बैसे एकांतीं अपुल्या सदनीं
जीव कांचणी लागुन, छाया वठली त्याची कृशवदनीं

भिंतीवरल्या अपुल्या मोहक खिळवुनि चित्रावर नयनें
घालविले षण्मास तयानें; वाजविलें न कधीं गाणें

भेट पत्र वा वार्ता येई मुळिं न कलेची तों कानीं
सांज घालवी म्हणुनि एकला टेकडीवरी तो ध्यानीं

वेताळावर पुन्हा छेडुनी कोमल किरणांच्या तारा
लकेर फेकित नाचत आला मधुर वसंताचा वारा

कवि-कातळही चंद्रकरानें आणि सुगंधानें न्हाला
संमेलन-दिन तोच मागला फिरुन पुन्हा होता आला

आनंदाची लकेर उठली विद्यालय-वातावरणीं
मोहनचें मन औदासीन्यें भरलें लागुन परि झुरणी

व्याकुळ होउन मुग्धपणानें थेट घराला तो आला
दुःख दाटलें; हृदयीं भिनला पुरता शिरलेला भाला !

अंधारांतच खोलित बसतां, खळबळ होय मनीं जंगी
मन रिझवाया काढी मग तो, धूळ झाडुनी, सारंगी

विश्व धवळलें पुरतें न्हाउन पयःसागरीं बाहेरी
शांतपणें कीं सारंगीच्या बसलें ऐकाया लहरी ?

सुस्वर-संगम होउन, कानीं झंकारध्वनि मधु आला
आणि वाजलें कवन कलेचें मंजुळ 'सारंगीवाला'

तनमन विरलें एकपणानें वाजवितांना हें गीत
सुरासंगतीं अश्रूमधुनी झरझर झरली तों प्रीत !

सूर नादले, अश्रु गळाले ! गीत परी चाले तेंच !
तों झंकारीं सहज निघाले ध्वनि हे करुणरसाचेच—

( गजल )

‘हें काय असें होई ! साशंक धपापे ऊर !
डोळ्यांत खळाळे पूर ! चित्तांत उठे काहूर !

एकांत गमे ठेवी छातीवरती ओझें
अंधार फिरे भोंती, गेला दुनियेचा नूर
हें काय असें होई’......

पालुपदावर पुनरपि अंगुलि आली तों तुटली तात,
आणि अचानक हृदय तयाचें थिजलें, बसुनी आघात !

हृदयविदारक वार्ता कानीं कलावतीच्या आदळली
मूर्छित झाली कोमल बाला; आणि पुढें ती व्याकुळली !

आणि एकदिन, ज्यावर नव्हती प्रीति अशाच्या संसारीं
जाउनि पडली कला, आपुल्या ध्येयासाठीं झुरणारी !

करपूं लागे हृदय आंतले आंत आपुल्या सहजगुणें
औदासीन्यें कांहिंतरी तिज एकसारखें गमे उणें

तों वाऱ्यांतुन लकेर मंजुळ, पूर्वश्रुत यावी कानीं
आणि दिसावी मूर्त वायवी, मन विव्हळुनी प्रियध्यानीं

यापरि लागुन हृदया झुरणी, अंथरुणीं खिळली बाला
आणि निमालीं साश्रु लोचनें पाहत सारंगीवाला !

# रविकिरणमंडळाचीं पुस्तकें

| | |
|---|---|
| १ किरण ( पद्य, मंडळ ) | ०—४—० |
| २ काव्यविचार ( गद्य, मंडळ ) | १—०—० |
| ३ उषा ( पद्य, मंडळ ) | ०—१२—० |
| ४ मधु-माधव ( पद्य, घाटे-माधव जूलियन् ) | ०—१२—० |
| ५ शलाका ( गद्य-पद्य, मंडळ ) | १—०—० |
| ६ विरह-तरंग ( पद्य, माधव जूलियन् ) | ०—८—० |
| ७ कला ( पद्य, गिरीश ) | ०—६—० |

मंडळाचें पुढील पुस्तक

**ओजास्विनी**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा.
दा. क्र. 3182

## मंडळाच्या सदस्यांचीं इतर पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| १ | फार्शी-मराठी कोश | (माधव पटवर्धन) | ४—०—० |
| २ | विष्णु कृष्ण चिपळूणकर | (गद्य, माडखोलकर) | ०—१०—० |
| ३ | आधुनिक कविपंचक | ( ,, ,, ) | १—४—० |
| ४ | नाट्यरूप महाराष्ट्र | (गद्य, विठ्ठलराव घाटे) | छापत आहे. |
| ५ | दत्तांची कविता | (संपादक- ,, ,, ) | १—८—० |
| ६ | काळाच्या दाढेंतून | (पद्य, श्रीधर रानडे) | ०—४—० |
| ७ | अभागी कमल | (पद्य, गिरीश) | ०—१२—० |
| ८ | वीणाझंकार | (पद्य, यशवंत-गिरीश) | शिल्लक नाहीं. |
| ९ | यशवंती | (पद्य, यशवंत) | ०—१०—० |
| १० | इंदुकला | ( ,, ,, ) | ०—३—० |
| ११ | मित्रप्रेमरहस्य | ( ,, ,, ) | ०—४—० |

मंडळाचा पत्ता—४६१ शनवार, पुणें शहर.

REFBK-0003142
REFBK-0003142

प्रकाशकः— [illegible] ए.
'रविकिरणमंडळ', ४६१ शनवार, पुणें.

मुद्रकः—अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें